गोविन्दानन्दसुधा

सद्गुरु श्री बाबाजीमहाराज पंडितांनी केलेला अनुवाद

॥ श्री ज्ञानेश्वरमाउली ॥

मंगलाचरण

जयति जयति विष्णोर्वाक्यभावार्थकारी ।
ऋतचितिसुखमूर्तिः स्वीयकाम्यानुकारी ।
शिवपुरमिव भातीन्द्राणितीरं यदीय-।
द्वयचरणनखाभा ध्वस्तमायांधकारम् ॥१॥

अर्थ :- श्रीविष्णूच्या वाक्यांचा भावार्थ प्रगट करणारे म्हणजे भगवान् श्रीकृष्णांनी सांगितलेल्या गीतेवर भावार्थदीपिका नांवाची टीका लिहिणारे, आपल्या भक्तांच्या इच्छेनुसार साकार होणारे, आपल्या दोन्ही चरणनखांच्या तेजानें मायारूप अंधःकाराचा नाश करणारे व श्री कैलास किंवा काशी यासारखें प्रकाशरूप जें इंद्रायणी तीरावरील आळंदीक्षेत्र येथे वास्तव्य करणारे जे सच्चित् सुखरूप श्रीज्ञानेश्वर महाराज यांचा अनेकवार जयजयकार असो ॥१॥

भक्तिलक्षण

अनध्यस्तविवर्तेऽस्मिन् गुरौ वा शिवकृष्णयोः ॥
तैलधारेव या प्रीतिर्भक्तिः श्रुत्यनुशासनम् ॥२॥
ज्ञाते तत्त्वे ऽप्यगर्वाय सद्गुरोर्भक्तिरिष्यते ।
सच्छिष्याणां साहजिकी तद्भिदुच्छेदने परा ॥३॥
शिवभक्तिः सदा ग्राह्या विश्वरागनिवृत्तये ।
कृष्णभक्तिः सदा ग्राह्या रसास्वादापनोदिनी ॥४॥

अर्थ :- अनध्यस्तविवर्त श्रीगुरूचे ठिकाणीं किंवा शिवकृष्ण यांचे ठिकाणीं तैलधारावत् अखंड वाहणारी जी प्रीति ती भक्ति होय अशी श्रुतीची शिकवण आहे ॥२॥ आत्मतत्त्व जाणल्यानंतरहि ज्ञानाचा अहंकार नाहींसा करण्याकरिता श्रीससद्गुरूची भक्ति

करणें इष्ट आहे. कारण द्वैतभासाची निवृत्ति करणारी ही भक्ती सच्छिष्याचे ठिकाणीं स्वाभाविक असते ॥३॥ दृश्य पदार्थाचे ठिकाणीं आसक्ति नसावी म्हणजे वैराग्य प्राप्त व्हावे म्हणून शिवभक्ति सदा करावी व त्याचबरोबर मी सुखभोक्ता आहे, हा अहंकार नाहीसा व्हावा म्हणून श्रीकृष्णभक्ति नेहमीं करावी ॥४॥

श्रीगुरूचे ठिकाणीं हरिहरभावना

शिष्यप्रेम्णा जगद्बाधाद् गुरुर्हरिहरात्मकः ।
तद्भक्तिर्व्यापिनी ग्राह्या देवभावसमन्वयात् ॥५॥

श्रीगुरु शिष्यावर प्रेम करतात म्हणून ते हरिरूप आहेत व जगताचा बाध म्हणजे जगन्मित्थ्यात्व पटवून देतात म्हणून ते शंकररूप आहेत. अशा त्या सद्गुरुमूर्तीत हरिहरांचा समन्वय होत असल्यामुळे त्यांच्या (श्रीगुरूच्या) ठिकाणीं होत असलेली भक्ति व्यापकच समजली पाहिजे ॥५॥

वेदान्त व योगशास्त्रानें श्रीगुरूचे ठिकाणी भक्तिस्थापन

देवत्वगुणरूपस्याऽऽश्रयो द्रव्यं भवेद्गुरुः ।
इति न्यायेन संचिन्त्य नात्मभिन्नं पुनश्च तत् ॥६॥
इति वेदान्ततो ज्ञात्वा स्थापयेद्योगशास्त्रतः ।
सद्गुरावात्मानुरागं भक्तिशास्त्रेण केवलम् ॥७॥
गुरुपादस्थायिभावम् अखंडरसतां नयेत् ।
काठिन्यं विषये कुर्याद् द्रवत्वं सद्गुरोः पदे ॥८॥
उपायैः शास्त्रसंदिष्टैरनुक्षणमतो बुधः ।
एवमेव प्रक्रिया वाप्यस्तु शास्त्रानुसारिणी ॥९॥ (य २ पू १९३)

अर्थ :- देवरूपगुणांचा आश्रय गुरुरूप द्रव्य आहे, या न्यायानें श्रीगुरूचें चिंतन करावें. पुनः गुरु आपल्या आत्म्याहून भिन्न नाहींत हें **वेदान्त**शास्त्रांतून जाणून **योग**शास्त्रानें म्हणजे ध्यानयोगानें तें श्रीगुरुरूप चित्तांत दृढ करावें व श्रीसद्गुरूचे ठिकाणी आत्मप्रेम केवळ **भक्ति**शास्त्रानेंच स्थापन करावें ॥६-७॥ गुरुचरणरूपी स्थायिभावाला म्हणजे प्रेमभावाला अखंड रसत्वाला

आणावें म्हणजे तें प्रेम उत्कट करावें (असा प्रेम उत्पन्न होण्याचा उपाय म्हणजे) विषयांचे ठिकाणीं काठिण्य म्हणजे अनासक्ति धारण करावी व श्रीगुरुचरणाचे ठिकाणी चित्त आसक्त होईल असा प्रयत्न करावा ॥८॥ हाच उपाय शास्त्रांनी सांगितला आहे. म्हणून शहाण्यांनी नेहमी याच उपायाचा अवलंब करावा किंवा शास्त्रांला अनुसरून हीच एक प्रक्रिया आहे ॥९॥

भक्तिशास्त्र स्वतंत्र आहे

तल्लाभाय साधनानि कथितानि महात्मभिः ।
सर्वमार्गः स्वतंत्रोऽयं भक्तिमार्गोऽथ शब्दतः ॥१०॥
सूत्रादिभिः समारब्धो ब्रह्मपुत्रमुखैर्यतः।
समाधिर्भक्तियोगेन घेरण्डमुनिभाषितम्॥११॥[२]

अर्थ :- तो गुरुप्रेम प्राप्त व्हावा म्हणून महात्म्यांनी साधनें सांगितली आहेत. 'अथ' या शब्दानें भक्तिशास्त्राचा आरंभ केला असल्यामुळे हा भक्तिमार्ग सर्व मार्गांहून स्वतंत्र आहे. ॥१०॥ कारण हा भक्तिमार्ग श्री नारदादिकांनी सूत्रादिद्वारा प्रतिपादिला आहे. समाधि भक्तियोगाने साधला जातो असे घेरंडाचार्यांचेहि[२] म्हणणे आहे. ॥११॥*(टीप - [१]शांडिल्यसूत्रे नारदीयसूत्रे चाथशब्दारंभबोधनात् स्वतंत्रत्वम् तथा च सूत्रे १.''अथातो भक्तिजिज्ञासा'' व २.''अथातो भक्तिं व्याख्यास्यामः)*

(टीप - (२) तच्चोक्तं घेरण्डसंहितायाम् -
स्वकीयहृदये ध्यायेदिष्टदेवस्वरूपकम् ।
चिंतयेद्भक्तियोगेन परमाल्हादपूर्वकम् ॥१॥
आनंदाश्रुपुलकेन दशभावः प्रजायते ।
समाधिः संभवेत्तेन संभवेच्च मनोन्मनी ॥२॥

आपल्या इष्ट देवाच्या स्वरूपाचें आपल्या हृदयांत ध्यान करावें. व त्या स्वरूपाचें भक्तीनें व अत्यंत आल्हादपूर्वक चिंतन करावें.१. आनंदाश्रु व रोमांचित होणें यांच्या योगानें प्रेमस्थिति प्रगट होते. व त्यामुळें समाधि साधला जातो व मन उन्मन होतें.२.

भक्तीचे मुख्य ३ प्रकार

गौणी-मध्या-परा-भेदाद्भक्तिः प्रोक्ता त्रिधा बुधैः।
गौण्यष्टधा द्विधामध्या परैकैव निबोधत ॥१२॥

अर्थ :- ज्ञात्यांनी **१. गौणी, २. मध्या व ३. परा** असे भक्तीचे तीन प्रकार सांगितले आहेत. गौणी भक्ति आठ प्रकारची आहे, मध्या दोन प्रकारची व परा एक प्रकारची आहे. ॥१२॥

गौणी भक्तीचे ८ प्रकार

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।
अर्चनं वंदनं दास्यं सख्यं गौणीयमष्टधा ॥१३॥
भावयेत्संसृतौ दुःखं विषये दोषदर्शनात् ।
गृहसौख्यं परित्यज्य साधुसंगतिमाश्रयेत् ॥१४॥

अर्थ :- श्री विष्णूच्या लीलांचे श्रवण, कीर्तन, स्मरण, त्याची चरणसेवा, त्याची पूजा, त्याला नमस्कार करणें, त्याचे दास्य करणें व त्याच्याशीं सख्य जोडणें असे हे आठ प्रकार गोणीभक्तीचे आहेत. ॥१३॥ विषयांचे ठिकाणीं दोष पाहून संसार दुःखदायक आहे असे नेहमी चिंतन करावें. **गृहसौख्य सोडून सांधूंचे संगतीचा आश्रय करावा.॥१४॥**

सगुण निर्गुण

निर्गुणः सगुणश्चैव भगवान् परमेश्वरः ।
ज्ञानगम्यो निर्गुणोऽसौ सगुणस्त्वनुरागतः ॥१५॥

भगवान् परमेश्वर सगुण व निर्गुण असा दोन प्रकारचा आहे.**ज्ञानानें कळतें तें निर्गुण व प्रेमानें कळतें ते सगुण होय ॥१५॥**

हरिहरांचे परोक्ष अनध्यस्तविवर्तत्व

अनध्यस्तविवर्तोऽपि सगुणोऽयं द्विधा भवेत् ।
अपरोक्षः परोक्षश्च परोक्षः शंकरो हरिः ॥१६॥

अनध्यस्तविवर्त असलेले सगुणस्वरूप निरुपाधिक असून ते दोन प्रकारचे आहे. एक परोक्ष व दुसरें अपरोक्ष. शंकर व श्रीहरी

हे परोक्ष आहेत.॥१६॥

सद्‌गुरूंचे अपरोक्ष अनध्यस्तविवर्तत्व

अपरोक्षो गुरुर्ज्ञेयो साधुमूर्तिसमन्वितः।
अपरोक्षगुरोर्योगे परोक्षविरहो भवेत् ॥१७॥
परोक्षप्रतिमादौ चापरोक्षविरहो भवेत् ।
एवमपि हृदि ध्यायेदपरोक्षं सदैव हि ॥१८॥
कुर्यात्तदर्थमेवादौ श्रवणं साधुवक्त्रतः ।
परोक्षाऽपरोक्षयोश्च सत्समन्वयहेतवे ॥१९॥
ऐतिह्येन प्रमाणेन परोक्षाकारबोधतः ।
सद्गुरौ अपरोक्षेऽस्मिन् गुणभावं निवेशयेत् ॥२०॥

अर्थ :- सर्व साधूंचा ज्या ठिकाणीं समन्वय आहे असा श्रीगुरु अपरोक्ष परमात्मा जाणावा. अपरोक्ष श्रीगुरूचा योग असतांना म्हणजे डोळ्यांसमोर असतांना परोक्ष अशा श्रीहरीच्या व श्रीशंकराच्या ठिकाणी विरह असतो. ॥१७॥ परोक्ष अशा श्रीशंकर व श्रीहरि यांच्या मूर्ति समोर असतांना श्रीगुरुबद्दल विरह असतो. असे असले तरी अपरोक्ष अशा श्रीगुरूचे निरंतर अंतःकरणात ध्यान ठेवावें ॥१८॥ परोक्ष शंकर, श्रीहरि व अपरोक्ष श्रीगुरु यांचा नेहमी संयोगवियोग प्रेम असावा. व त्याकरितां ते एकरूप आहेत असा निश्चय करावा. व त्यांचे ठिकाणी प्रेम प्राप्त व्हावें म्हणून प्रथम साधूंच्या मुखानें भगवंताच्या लीलांचें श्रवण करावें. ॥१९॥ ऐतिहासिक प्रमाणाने म्हणजे पुराणांतील इतिहासावरून, लीला करणाऱ्या श्रीशंकराच्या व श्रीहरीच्या मूर्ति आहेत हे जाणून अपरोक्ष अशा सद्गुरूच्या ठिकाणीं त्या सर्व लीलांचा उपसंहार करावा. ॥२०॥

आदौ गुणाः परोक्षस्य मूर्तौ भाव्या स्थिरा बुधैः ।
अपरोक्षाश्रयं तेषां सद्गुरुं परिकल्पयेत् ॥२१॥
ऐतिह्यस्य परोक्षस्य मूर्तौ प्रस्थापयेत् गुणान् ।
सद्वक्त्रश्रवणेन-एतन्मानसे स्थापयेत् पुनः ॥२२॥
मानसमपि तत्तीव्रं, स्थापयेत्सद्गुरौ पुनः ।

एतद्धि कीर्तनं शुद्धं श्रवणावर्तनं स्वयम् ॥२३॥
श्रुतं यत्साधुवक्त्रेण तदुल्हासेन वर्णनम् ।
कीर्तनं मुनयः प्राहुर्यस्मिन् प्रेममयी तनुः ॥२४॥
साकारं वर्णयेद्विष्णुं सन्निधौ गुरुदेवयोः ।
असन्निधौ निराकारं चित्ते साकारसंयुतम् ॥२५॥

अर्थ :- प्रथम सूज्ञ पुरुषांनी **पूजेकरितां घेतलेली देवाची मूर्तिच पुराणांतून ऐकलेल्या लीला करणारी आहे अशी दृढ भावना करावी** व **त्या लीलांचे अपरोक्ष श्रीगुरूच आश्रय आहेत अशी भावना करावी** ॥२१॥ पूजे करितां घेतलेल्या मूर्तीचे ठिकाणीं, होऊन गेलेल्या भगवान शंकर व श्रीहरी यांच्या अवतारांचे, गुण स्थापावे म्हणजे याच मूर्तीनें त्या लीला केल्या अशी दृढ भावना करावी व त्या मूर्ती अंतःकरणांत प्रगट व्हाव्या म्हणून पुनः पुनः त्या अवतारांच्या गुणांचे साधूंच्या मुखांतून श्रवण करून त्या मूर्ती मनांत ठसवून घ्याव्या ॥२२॥ अंतकरणांत पूर्णपणे ठसविलेले ते गुण पुनः सद्‌गुरूचे ठिकाणीं तीव्र स्थापन करावे. असा हा स्वाभाविक होऊं लागलेला श्रवणाचा अभ्यास हेच शुद्ध कीर्तन होय ॥२३॥ साधूंच्या मुखानें ऐकलेले भगवंताचे गुण उल्हासपूर्वक वर्णन करणें याला मुनी कीर्तन म्हणतात. यामुळें शरीर प्रेममय बनून जाते ॥२४॥ श्रीगुरु किंवा देव यांचे समोर कीर्तन करीत असतांना विष्णूच्या साकार स्वरूपाचे गुणवर्णन करावे व हे समोर नसतील तर साकारयुक्त भगवंताच्या निराकार स्वरूपाचे वर्णन करावे व चित्तांत साकार सगुण असावे ॥२५॥

वाचा गोविंदवर्तिन्या कीर्तनं स्मरणं भवेत् ।
कीर्तने स्याद् यथानन्दस्तथैकान्ते ऽपि जायते ॥२६॥
कर्मणा मनसा वाचा सद्गुरोः *पादसेवनम् । (य २ उ २९४)
तनुर्वाणीमनश्चैव गुरुसेवार्थमाश्रयेत् ॥२७॥
भोग्यानामुपरत्यर्थं दृष्टं[४] मानसमेव वा ।
पंचम्यां सद्गुरुं देवमुपचारैः समर्चयेत् ॥२८॥

पूजकाहंकृतेर्नाशो वन्दनेन उपजायते ।
भगवन्तमनन्यः सन् प्रणमेद् विगतत्रपः ॥२९॥
वंदने लाघवं दैन्यं तद्दास्येन प्रवर्धयेत् ।
भूत्वा निःसाधनं तस्मात्सख्यं संसाधयेद् हरौ ॥३०॥

अर्थ :- गोविंदाचें अखंड नाव घेणाऱ्या वाणीनें कीर्तन करणें याला स्मरण म्हणतात ह्या स्मरणानें कीर्तनांत जसा आनंद होतो तसाच आनंद एकान्तांत स्मरण केल्यानें होतो ॥२६॥श्रीगुरूंचें पादसेवन काया वाचा मनानें करावें. शरीर वाणी, मन श्रीगुरुसेवेंत लावावे ॥२७॥

(टीप :- गुरौ असन्निहितेऽस्तु परोक्षं प्रतिमापादसेवनम्, सन्निहिते किं तेन परोक्षेण ॥२७॥)

भोग्य जे विषय आहेत त्यांचे ठिकाणीं उपरति व्हावी म्हणून- म्हणजे विषय वासना निवृत्त व्हावी म्हणून - अपरोक्ष जे सद्गुरु व परोक्ष अशा देवांच्या प्रतिमा यांची नाना प्रकारच्या उपचारांनी किंवा मानसिक उपचारांनी पूजा करावी२ ॥२८॥

(टीप २- द्वितीयान्तपाठे - दृष्टम् = अपरोक्षं सद्गुरुम् ॥ मानसम् = परोक्षं देवम् (प्रतिमादिकम्) ॥ अत्र दृष्टमानसशब्दौ विभक्तिविपरिणामेन उपचारैरित्यस्यापि विशेषणतया ऽ न्वितौ ॥ दृष्टैः = पाद्यार्घ्यादिभिः ॥ मानसैः = मनसा रचितैः (उपचारैः) ॥ सेवकवद् बद्धपाणिर्भूत्वा का आज्ञेति प्रतीक्ष्य कथितमकथितम् वा स्वामीकार्यं करोतीति दास्यलक्षणम् ॥२८॥

'मी पूजक आहे' या अहंकाराचा नाश वंदनभक्तीनें होतो. म्हणून परमेश्वराला किंवा श्रीगुरूला अनन्य व्हावे. (त्यांचेहून दुसरें दैवत मनांत न आणणे हें अनन्य होणें होय) व सर्व लज्ञा सोडून त्यांना साष्टांग नमस्कार करावा ॥२९॥ वंदन भक्तीनें प्राप्त झालेली निरंहकारता व दीनता भगवंताच्या दास्यभक्तीने वाढवावी. दास्यभक्ति वाढली असतां निःसाधनत्व प्राप्त होते. त्या निःसाधनत्वानें हरीशीं सख्य साधावे ॥३०॥

ये वै निःसाधना दीनास्तेषां नारायणः सखा ।
क्रीडते तैः सहैवाशु भगवान् भूतभावनः ॥३१॥
भेदाश्रितोऽस्ति संबंधस्तस्मिन् भेदनिवृत्तये ।
सकर्त्रासख्यभक्त्यन्तं कृतं नारायणेऽर्पयेत् ॥३२॥

अर्थ :- जे भक्त निःसाधन होतात (म्हणजे भगवत्प्राप्ति कर्मजन्य नाहीं म्हणून सर्व साधनें सोडून केवळ भगवंताच्या दयेवर अवलंबून राहतात) त्यांचा सखा नारायणच होतो व सर्व प्राणिमात्रांना उत्पन्न करून त्यांचे रक्षण करणारा नारायण मग निःसाधन झालेल्या भक्ताबरोबर क्रीडा करू लागतो ॥३१॥ हा स्वामीसेवकसंबंध भेदाला धरून असतो व भेद राहिला तर प्रेम कमी होतो; म्हणून त्या संबंधातील भेद नाहीसा करण्याकरतां कर्तृत्व धारण करण्यापासून तो सख्यभक्तीपर्यंत केलेल्या सर्व क्रिया नारायणाला अर्पण कराव्या ॥३२॥

इयं गौण्यष्टधाभक्तिर्मध्यमात्वमुपागता ।
मध्यमाऽऽत्मार्पणप्रेमलक्षणा भेदतो द्विधा ॥३३॥
ममताहंतास्पदत्वादात्मार्पणमपि द्विधा ।
इदंप्रत्ययनिर्दिष्टं निविष्टं ममतास्पदे ॥३४॥
मित्रगोत्रपुत्रगेहवित्तदारादिकं हरौ ।
शब्दादिभोग्यजातं च निवेद्य ममतां त्यजेत् ॥३५॥
अन्नवैकारिकं देहं श्रोत्रादीनीन्द्रियाण्यपि ।
प्राणान्मनोबुद्धिमहंकारं चापि समर्पयेत् ॥३६॥

अर्थ :- ही आठ प्रकारची भक्ति स्वाभाविक झाली म्हणजे तिला **मध्यमा** म्हणतात. ही मध्यमाभक्ति **आत्मार्पण** व **प्रेमलक्षणा** अशी दोन प्रकारची आहे. 'इदं' म्हणजे 'हे' या शब्दाने दाखविले जाणारे सर्व विषय ममतास्पद होत ॥३४॥ मित्र, कुळ, गोत्र, घर, धन, दारा वगैरे व शब्दादि सर्व भोग्य विषय भगवंताला अर्पण करून ममतेचा त्याग करावा ॥३५॥ अन्नविकार असा देह, श्रोत्रादि इंद्रियें, पंचप्राण, मन, बुद्धि, अहंकार हे सर्व श्रीहरीला अर्पण करावे

म्हणजे त्याच्या सेवेंत लावावे ॥३६॥

वल्लभमत

एतदात्मार्पण शुद्धं गृहीतं वाल्लभे मते[३] ।
तत्राप्युक्तं पुनः प्रेमवर्धनं मम संमतम् ॥३७॥

अर्थ :- हे शुद्ध आत्मर्पण वल्लभमतांत मानलेले आहे परंतु तेथेच न थांबता पुन प्रेमवर्धन करणेंच योग्य आहे, असे माझें मत आहे ॥३७॥

(टीप :- सहस्त्रपरिसंवत्सर अमितकालजात-कृष्णवियोगजनित-तापक्लेशानंत तिरोभावोऽहं भगवते कृष्णाय देहेन्द्रियप्राणान्तःकरणतद्धर्मांश्च दारागारपुत्राप्तवित्तेहपराण्यात्मनासह समर्पयामि दासोऽहं कृष्ण तवास्मि''॥ एतद् गद्यं वल्लभमतेऽत्यंतनिगूढम् प्रायशो श्रीभागवतानुसारी ॥ तथापि आत्मनिवेदनानंतरमपि ''दासोऽहं कृष्ण तवास्मि'' इति यदुक्तं कृष्णवियोगजनित-तापक्लेशानंतमेतेन आविर्भवनेच्छा च दर्शितेत्येतत्सर्वमस्मन्मते प्रेमलक्षणापर-सूचकम् ॥ तथापि तेषां मते आत्मनिवेदनमात्रपर्यवसायित्वाद्योजनाविषये भ्रमामः॥)

आत्मार्पणाद् अचिन्त्यश्चेद् रसास्वादस्य संभवः।
ताटस्थ्यं वा भवेत्तेनाद्वैतहानिर्भवेत्पुनः ॥३८॥
आत्मरत्यविरोधेनैवार्पकत्वनिवृत्तये ।
योगे प्रेम्णा विरहोपलालनानुभवस्थितिः ॥३९॥
यद्यन्निवेदितं तत्तद्विस्मृतं सर्वमेव हि ।
तथापि स्मरति प्रेमचिन्हितं पुलकाश्रुभिः ॥४०॥ (य२उ.१९५)

अर्थ :- आत्मार्पणानंतर भगवच्चिंतन केले नाहीं तर**रसास्वाद** म्हणजे भक्त्यहंकार विघ्न उत्पन्न होण्याचा संभव आहे किंवा **ताटस्थ म्हणजे उदासीनता येईल व त्यामुळे पुनः अद्वैत हानी होईल म्हणजे अद्वैत स्थिति नाहीशी होईल**॥३८॥ आत्मप्रेमाशीं विरोध न येतां अर्पकभाव म्हणजे सोहंभाव निवृत्त व्हावा म्हणून संयोग असतांहि प्रेमाने विरह वागविण्याची अनुभवस्थिति बाणली

पाहिजे ॥३९॥ जे जे भगवंताला अर्पण केले त्याची आठवण येऊ नये; तथापि रोमांच व आनंदाश्रु ह्या चिन्हांनी प्रेमाचे स्मरण दिसून येते ॥४०॥

लोकहानौ न चिंता स्याद्वेदानपि च संन्यसेत् ।
वेदसारं परं ज्ञात्वा निर्गुणं परमेश्वरम् ॥४१॥
तमेव सगुणं शुद्धं गुरुदेवसमन्वितम् ।
अनध्यस्तविवर्तं हि सत्संगेनानुभावयेत् ॥४२॥

अर्थ :- वेदाचे सार अशा निर्गुण परमेश्वरास जाणून लोकहानीची चिंता सोडून द्यावी व वेदांचाहि म्हणजे प्रवृत्तिनिवृत्तिमार्गाचाहि त्याग करावा ॥४१॥ सगुण असे श्रीगुरु व देव यांचा समन्वय त्याच शुद्ध स्वरूपांत आहे, असे जाणून त्या सगुण अनध्यस्तविवर्ताचा सत्संगाच्यायोगाने अनुभव घ्यावा ॥४२॥

मृदु, मध्यम व तीव्र भक्तींचे लक्षण

तस्यैवाहमिति प्रीतिर्मृदुर्जाता निवेदनात् ।
ममैवासौ भूमिकां तां मध्यसंवेगतो नयेत् ॥४३॥
मध्यमेयं हि माधुर्यात्परात्वमनुगच्छति ।
योगे वियोगे प्रीतिः स्याद्यथा वै व्रजयोषिताम् ॥४४॥

अर्थ :- ही उत्पन्न झालेली प्रीति आत्मनिवेदन करून ''तस्यैवाहम्'' म्हणजे 'त्याचाच मी आहे' अशी होते. ही**मृदुसंवेगरूप** प्रीति पुढे वाढवून तीच ''ममैवासौ'' म्हणजे 'माझाच तो' या **मध्यमसंवेगरूप** भूमिकेवर आणावी ॥४३॥ ही मध्यमसंवेगरूप प्रीति माधुर्यप्रेमाने पराभक्ति होते. या परा भक्तींत व्रजगोपिकांप्रमाणे 'योगे' म्हणजे संयोगांत व वियोगांत प्रीतिच असते ॥४४॥

अदृष्टे दर्शनोत्कंठा दृष्टे विश्लेषभीरुता ।
दृष्टे ऽदृष्टे परं दुःखं * तदप्यस्ति महत्सुखम् ॥४५॥

अर्थ :- भगवान् अदृश्य झाले तर दर्शनाची उत्कंठा लागते व दृश्य म्हणजे प्रगट झाले तर पुनः अदृश्य होऊन वियोग तर होणार नाहीना, अशी भीति वाटूं लागते. प्रगट झाले किंवा गुप्त

झाले असता अत्यंत तळमळ राहते* व ती तळमळ अत्यंत सुखरूप असते ।।४५।।

(टीप -*अत्र दुःखं द्विविधम् । प्रथमं स्वभावतो द्वेष्यम् । तच्च संसाररूपं त्रिविधम् । आध्यात्मिकम् आधिदैवमाधिभूतमिति भेदात् ।। *द्वितीयं तु दुःखशब्दमात्रं दुःखमिव प्रत्ययाभासं इष्टानुरागेण अत्यंत-व्याकुलत्वम् इति तत्सुखमेव अनुरागत्वाद् एतत्सद्भिरेव अनुभाव्यं नहि तर्केण प्रतिपत्तुं शक्यते ।)

अद्वैते सहजप्रीतिः क्रियाभावंविना हरौ ।
परा तातपदैरुक्ता [१] दर्शिता रमणैरपि [२] ।।४६।।

अर्थ :- क्रियेचा भाव म्हणजे कर्तृत्वाहंकार उत्पन्न न होता अद्वैतांत श्रीहरीचे ठिकाणी स्वाभाविक अकृत्रिम प्रेम राहणे [२] यालाच श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी पराभक्ति म्हटले व आहे श्रीकृष्णांनीहि तेच सांगितलें आहे ।।४६।।

(टीप -१. तैसी क्रिया कीर न साहे । परी अद्वैतीं भक्ति आहे । हें अनुभवाचि जोगें नोहे । बोला ऐसें ।। ज्ञानेश्वरी अ. १८ (२).ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति । समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् ।। गीता.अ.१८.)

परा भक्ती

यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।
जागृतसौषुप्तवेदाभ्यां सा समा गुरुदेवयोः ।।४७।।
माहात्म्यज्ञानसंयुक्ता प्रीतिर्वै व्रजयोषिताम् ।
यथा तथा स एवाहं भूमौ रक्तिः परा भवेत् ।।४८।।

अर्थ :- ज्याची ईश्वराचे व गुरूचे ठिकाणी पराभक्ति आहे त्याची गुरु व देव यांचे ठिकाणी सारखीच भक्ति असते असे श्रुतीत Ä Tyoõ Ì ¢æ oÂ z E¢Òz @@ 7 @@ जशी परमेश्वराचे महात्म्यज्ञान कायम असून व्रजयुवतीची भगवंताचे ठिकाणी प्रीति होती तशीच ती ‘स एवाहम्’ ‘तोच मी’ या भूमिकेवर आली म्हणजे पराभक्ति होते

।।४८।।

समाधि आणि व्युत्थान

विज्ञातं सच्चिदानंदं समाधौ व्यतिरेकतः ।
अन्वयेन पुनस्तद्धि व्युत्थाने व्यक्ततामियात् ।।४९।।
स्थाय्येव रसतां यातः परानंदतया हरिः ।
अनध्यस्तविवर्तश्चेत् किमन्यदवशिष्यते ।।५०।।
अभेदे सच्चिदानंदं भेदे भाति तदेव हि ।
अध्यस्तजातिव्यावृत्तौ व्यक्तिः कृष्णशिवात्मिका ।।५१।।

अर्थ :- व्यतिरेकानें जें सच्चिदानंद स्वरूप समाधींत जाणले तेंच व्युत्थानदशेंत अन्वयज्ञानानें पुनः सगुण स्वरूपाला येते ।।४९।। स्थायी भाव म्हणजे असलेला प्रेमभाव परमानंद स्वरूपाला आला म्हणजे अनध्यस्तविवर्त असा हरि प्रगट झाल्यावर दुसरे काय शिल्लक राहिले? ।।५०।। अभेदस्थितींत जे सच्चिदानंदस्वरूप भासते तें सच्चिदानंदस्वरूप भेदस्थितीतहि सगुणरूपानें भासतें. सर्व अध्यास निवृत्त झाल्यावर प्रत्येकव्यक्ति कृष्णशिवात्मक भासते ।।५१।।

सेव्य-सेवक भावांत प्रेमैक्य

सेव्यसेवकभावेऽपि न प्रेमैक्यं विनश्यति ।
“शिवो भूत्वा शिवं यजेत्” इत्याह जननीश्रुतिः ।।५२।।
श्रीमज्ज्ञानेश्वराचार्यः सर्वभूतगुहाशयः।
तच्चरणगांगं पीत्वा तस्मै सर्वं समर्पितम् ।।५३।।

।। श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादरूपा गोविंदानन्दसुधा समाप्ता ।।

।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

अर्थ :- सेव्यसेवकभाव राहत असला तरी प्रेमैक्यस्थिति बिघडत नाही. कारण श्रुतिमातेनें सांगितलें आहे की “शिव होऊन शिवाचें पूजन करावें.।।५२।। श्रीज्ञानेश्वर सद्गुरु सर्वान्तर्यामी आहेत. त्यांचे चरणापासून निघालेले गंगोदक पिऊन ग्रंथकर्तृत्व त्यांनाच समर्पण केले.।।५३।।

।। समाप्त ।।

*****